

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९५०३
REFBK-0011255
REFBK-0011255

# हिरवें जग

- आनंद यादव

चंद्रकांत शेटये प्रकाशन मंदिर.

मुंबई सरकारनें १९६० सालीं खास
बक्षीस देऊन गौरविलेला कवितासंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नोंः दि: ........

आनंद यादव

# हिरवें जग

REFBK-0011255
REFBK-0011255

दीड रुपया

प्रथमावृत्ति
ऑगस्ट एकोणीसशेंसाठ

(c) आनंद यादव

मुखपृष्ठ
सॅम् आर्ट

ब्लॉक्स्
उदय प्रोसेस्

प्रकाशक
चंद्रकांत शेटये
चंद्रकांत शेटये प्रकाशन मंदिर
शिवकृपा
कोल्हापूर क्र. ३

प्रमुख विक्रेते
अभिनव पुस्तक मंदिर
पुणें क्र. ४

मुद्रक
श्री. बा. बागणे
साधना मुद्रणालय
लक्ष्मीपुरी, कोल्हापूर क्र. २

भाई आणि ताई ( श्री. पु. ल. देशपांडे आणि
सौ. सुनीता देशपांडे ) यांच्या पवित्र चरणीं–

– त्यांनीं माझी भावना आणि प्रेरणा
ज ग वि ली आ णि जो पा स ली.

## हिरवें जग : 'अंतरंग'


| | |
|---|---|
| आपलं आपूणच जपायचं | ५ |
| बाई-माणूस | ६ |
| यँ पावसा | ७ |
| पेरणीच्या दिसांत | ८ |
| गौरीचा सण | ९ |
| भर उनाचं | १० |
| लई वाटतंय् | ११ |
| पुढंला | १२ |
| शेवरीचं लगीन | १३ |
| मळणी | १४ |
| जातों हो | १५ |
| आंब्याच्या सावलींत | १६ |
| तळची भाकर | १७ |
| बरी न्हवं ही मस्ती | १८ |
| पाण्याच्या वाटंवर | १९ |
| वाटंवरच्या जुंधळ्यांत | २१ |
| या थंडीच्या दिसांत | २२ |
| बाळ आतां | २४ |
| गोंदणं | २५ |
| हिरवं जग | २६ |
| डोंगराच्या कनवटीला | २८ |
| गर्भ धरणीचा | २९ |
| केलंस मातरं जल्माचं | ३० |
| उसटं पाणी | ३१ |
| मी वडतों चिलीम | ३२ |
| भौमंच्या पुनवंला | ३३ |
| पानाचा इडा | ३५ |
| गेलं असतील भुक्यावुनी | ३६ |
| व्रत | ३८ |
| उठा आतां | ३९ |
| पातळ | ४० |
| भाकरी | ४२ |
| नाद मोटंचा ऐकून | ४३ |
| काळ्या पदराच्या आड | ४४ |
| हुलगला बाजार | ४५ |
| असल्या गोष्टी | ४७ |
| रानकोरट्याची फुलं | ४८ |
| केवड्याच्या पोटरीला | ४९ |
| कणसं | ५० |
| पोपटाच्या रानांत | ५२ |

## आपलं आपूणच जपायचं

नगं येऊंस उनाच्या रखांत;
लुगड्याचं खोचाण सोड खालीं.
केवड्याच्या पानागत गोऱ्या पोटऱ्या
करपून हुतील काळ्या बाभळी.

नगं जाऊंस नांगरटींतनं;
पायांवर पडत्यात खोडव्याचीं ढेकळं.
बेतानं उजर सऱ्या; न्हाईतर
हात हुतील चिंबल्यालं खळं.

लई कांपतंय् भरदार दंडाला;
नगं काढूंस उंसाचा पाला.
जुन्या कोटाचं हातूपं
उद्यां काढ दंडावर घालायला.

दुखत्यात मनगाटं भांगलून भांगलून;
धर माझ्यापशीं आरा.
घेईन तुझ्या मी आडवं
माझा लावून भराभरा.

– आगं, कामं करावींत बेतानं;
आपलं आपूणच जपायचं जिवाला.
म्हातारा-म्हातारी बोलत्यात तें
कायबी लावूं नगं मनाला.

९९२४४
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ ५ ...... वि:
क्रमांक .................. नों: दि:

# बाई-माणूस

लावत जा रोज कुक्कू आणून कसंबी;
न्हाईतर लावीन खुरपं मारून.

– पन्नास येळां सांगिटलं
माझं पायांत घाल म्हणून.

आगं, मी बापय–माणूस हाय;
मला कसली लाज नेसायला फाटकं ?

बाई-माणूस हाईस तूं
फेड बघूं तें जुण्यार दाटकं.

बाजारांत इकून बाळी शेळी;
उद्यां आण सोडवून डोरलं.

आणि अंग भरूनशान तुला
याक घे लुगडं थोरलं.

– मला नगं आतां भाकरी
आतांच प्यालोंय् मी पाणी.

तूंच खा पॉटभरूनशान
थानचं मूल हाय सोन्यावाणी !

# ये पावसा

ये आन्नदात्या पावसा,
वाऱ्यासंगं गडगडत.

हीं रानाची जळकी खाई
हाय अजून धडधडत.

आण सोसाटयाचा वारा,
मोड झाडं; उपट त्येंचीं मुळं.

उडीव हीं पाल्याचीं खोपटं
आणून भुताचं वावटुळं

येऊं देत चवताळून ढग,
भरूं देत वडं-वघळी.

इजा पाडून पायजेतर
घे ढोरा-पोरांचा बळी.

–पर नगं असं जाऊं
ताँड घेऊन कोपून.

लागल्यात समदींच वाटंला
आन्नपाण्यावांचून !

# पेरणीच्या दिसांत

खरं सांगू का, वहिनी ?
मला जराबी आवरत न्हाई भूक !
मग हे वार करण्यांत
कुठलं आलंय् सूख ?

रोजगाराला जायला पायजे
रोज एकाच्या बांधावर;
मग असलं उपाशी असलं
तर कोण घेईल कामावर ?

आतां कुठं लागलीया ही पेरणी
आठ-पंधरा दीस.
म्हणून हें वारांचं सोंग;
न्हाईतर काय खातीस ?

कोणतरी सांगतंय् टोंकणायला भुईमूग;
त्येचा मग धरतोंय् रोजगार,
आणि चूल बंद करून
असंल त्यो करतोय् वार !

दिलेलं टोंकणायला दाणं–
त्यांतलंच खातोंय् ईळभर.
शेतकरीबी देतोय् मुभा
वार केल्याचं सांगितल्यावर.

असंच करतोंय् मी पेरणीच्या दिसांत.
भाकरीचा तुकडा नसतोय् इळाच्या पोटीं.
उरीवतोंय् सांजच्यापारीं
बळंनं घरला न्यायला ओटी !

# गौरीचा सण

जरासं माझं ऐकून घेतां का ?
गौरीचा सण आलाय् तोंडावर.

मामाजी गेल्यात गांवाला.
द्या मला गवात भाराभर.

सांजचं नेऊन इकीन.
हुतील साताऽठ आण्याचं पैसं

मोडल्याल्या मासूळ्यांचं
घालीन त्येनं फासं.

तुम्ही दिल्याला हाय रुपाया
पान-सुपारींतनं उरवून.

हाईत माझंबी आठ आणं;
दादाकडनं आणल्यालं मागून.

असा हाय दीड रुपाया
ठेवल्याला उतरंडीला.

सोन्यासारखा सण आलाय्;
चोळी एक घेत्यें दंडाला !

# भर उनाचं

ये जळणाचं निमित काढून
मळीकडं भर उनाचं

समदींच जातील घरला
जेवायला सणाचं.

देईन पाटीभर जळाण;
वाळकं, वांगी कवळीं कवळीं !

कोण नसतील तवा
माझ्याच मालकीची असतीया मळी !

नेऊन ईक तीं बेतानं
भटा-बामणांच्या घरांत.

आरती-परती देऊन टाक.
तेवढंच कायतरी पडंल पदरांत !

आज हाय गुडीचा पाडवा;
येतील त्या पैशांची आण गहू-डाळ.

कर हुतील त्या चार पोळ्या;
खाईल तेवढंच पॉर-बाळ !

पर सारजे, ही चोरी
देवाघरीं हुईल का रुजूं ?

– पोराबाळांस्नीच घाल सण !
आम्ही कणी-कोंडाच खाऊन जगूं !

# लई वाटतंय्

आम्हांस्नीबी लई वाटतंय्
पोरांस्नी शिकवावं असं.
पर मागं पोटापाण्याचं
सदा न कदा लागतंय् पिसं !

पोरं थोरलीं करतांनं
आमचा राम आटतोय्.
आठ-नऊ वरसांचीं झाल्यावर;
मग ज्यो त्यो पॉट भरतोय्.

मग त्यांस्नी शाळंला घालून;
आणावं कुठलं त्येंच्या पोटाला ?
उलट त्येंच्या उसाबरी कराया
सवडी कुठं हाईत आम्हांला ?

आम्हांला काय इनामं हाईत ?
लंगुटी एवढीबी न्हाई पट्टी !
न्हेतावं दीस कसंतरी ढकलत.
आह्यो, आमच्या नशीबीं शेणाचीच पाटी !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

# पुढंला

पोरांचं हाय पुढंला लगीन;
वाईच इचारानं पेरणी वाढा.
जुंधळया-तुरीच्या पिकापरास
गव्हा-तांदळाचंच पीक काढा.

खोडव्याच्या रानांत नगं कडवाळ;
दोन्हीबी खांडांत हरबरा पेरा.
बैलांस्नी घालायला येईल
कडंवडंचा कापून मुगोरा.

उसाला घाला मायंदाळ सल्पीठ;
येईल बिगीद्यान् घाणा कराय्.
डोळयांत चुना घालूनशान
तंबाकू पायजे बरं जपाय्.

— मग नगं काढायला बोजा
माझंच दागिनं सुनंला घालीन !
येईल हाताखालीं माझ्या पोर !
घरांत फिरतांनं सुखानं बघीन !

# शेवरीचं लगीन

उंसाकडंच्या सारावर
गुलजार गार शेवरी.
वरण्याचा वेल नेसून उभी
ही बुरखा घेटलेली नवरी !

वाऱ्यासंगं हलत्यात कवातर
शेंगांचीं तोरणं लोंबत खालीं !
पिवळ्या फुलांचं हळदी गोंडं;
अहो, ह्या हिच्या मुंडावळी !

आतांशीं झालीया कवळी पहाट.
घटकाभरानं टाकायचं तांदूळ !
धुकं येऊन घालंल हिला
दहिंवराची गार आंघूळ !

निर्मळ गोरीपान किरणं
हळू हळू पुसतील अंग !
झुळूक करवली हलवून सांगल,
“अगं, नादांत होऊं नको दंग”

चिमण्या येतील सेस भराय्
घेऊन भाताचं दाणं.
धरतील एकमेकीच्या पदराला
नवऱ्याच्या नांवाचं म्हणायला गाणं !

उंसा-शाळवाची भोंवती दाटण;
पाव्हणं आल्यांत हे कराय् लगीन.
मीबी माळ्यावर चढून तें
पांखरं मारतां मारतां बघीन.

# मळणी

आभाळाचं घोटीव खळं
न्हाई त्येला तसूभरबी भळ.
टिच्चून भरल्यालीं चांदण्यांचीं कणसं
आणतांनं फुटला रातीचा ढळ !

घाटलीया ही जुंधळ्याची मळणी !
ढवळं-काळं ढगांचं बैल !
वारं दबीवतंय् त्यांस्नी सुरांत,
चालल्यात सगळं अंग सोडून सैल !

फिरतोय् चांद खळ्याच्या मधनं
बैलांच्या अंगावर फिरवत हात.
तेवढीच त्यांस्नी वाटतीया हुषारी.
शीण झडतोय्; चालतीया पात !

गारव्यांत हिडून काकडल्यावर
केलाय् जाळ उगवतीला कुणी.
रामाच्या पाऱ्यांत ही देवाची
किती गुमान चाललीया मळणी !

# जातों हो

जातों हो आतां मळ्याकडं;
सकाळधरनं हाय गांवांत.
दीस गेलाय् कडूसरीला.
उडली असंल घाई रानांत.

शेणं पडल्यात तशींच गोठ्यांत.
बैलं आणायचीं हाईत पाण्यासनं.
कडबा वोढायचा हाय सांजंचा.
पाणी माराय् पायजे धावंवरनं

उद्यां हाय बाजारचा दीस;
उपडायची हाय तवा भाजी.
बायका हाईत रोजगारानं
भांगलणीवर नजर न्हाई माझी.

–अजूनबी न्हाई 'ती' आली घरला
डोळ्याउजेडा घेऊन दुभतं ढॉर.
उशीरधरनं लागलंय् रडायला
घरांत ठेवल्यालं थानचं पॉर.

# आंब्याच्या सावलींत

रवंथ करणाऱ्या पाण्यांतल्या रेड्यागत
दमून बसलीया निवांत दुपार !
मोटंच्या करकरी, गाण्याच्या लकेरी
मळंकऱ्यासंगंच निजल्यात गार !

कुकूकोंबड्याची एकली घुक् घुक्
गुलबार चिच्चंवर सावलीत घुमती
नांगरट झालेल्या सडाच्या वावरांत
अजून बळवंकी पोटापायीं फिरती.

आणि–

पेंगणाऱ्या आंब्याच्या सावलींत
घोंगड्यावर बसल्यात राजा-राणी.
दोघांच्या पुढ्यांत हाय पडल्याली
धोतराच्या फडक्यांत भाकरी-चटणी.

बसल्यात घेत जणूं राम-सीता
वनवासांतलं मनाजोगं सूख.
जुंधळ्या-मिरचीच्या कोरड्या कोंड्यांत
तरण्या प्रीतीचं मिसळतंय् अमृत !

## तळची भाकर

ऐकलं काय हो,
उशीर करूनच न्यहारीला जावा.
जेवूं द्यात दीर–मामाजी आदी;
त्यांस्नी वाढत्यात थोरल्या जावा.
कोणबी न्हाई वागत
जिवाभावानं माझ्यासंगं
खाऊं द्यात तीं दाल्ला–बायकू
सोनं–रुपं आनंदानं.

जाऊन शिस्तीनं जेवायला तुम्ही
हळूच उचला तळची भाकर.
आणि तिच्या पापडाखालचं
लोणी, सांडगं खावा अगुदर.
– ठावं न्हाई कुणाला गुपीत
सासूबाईलाबी हें नका बोलूं
त्याबी घालत्यात दिरा–नणंदांस्नी.
'आणतां न्हवं मला दिवाळींत शालू ?'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत–
अनुक्रम ........................ विः ....................
क्रमांक ........................ नोंः दिः ..................

# बरी न्हवं ही मस्ती

बरी न्हवं ही मस्ती;
किती बाई, तुम्ही द्वाड.
कोणतरी असंल बघत,
राहून कुडाच्या ई आड.

नंदा-जावा गेल्या फुडं
धरलं असतील त्येंनी आरं.
अशी धरल्याव तुम्ही
राहील कीं काम सारं.

घ्या जेवून बिगीद्यान्;
येतील मामाजी खाकरत.
बाया करतील टवाळी;
बघून गालावयलं दांत.

घ्या-दिवळीचं असं
कवा करूं नये, देवा !
कायतरी निमित्तानं
घरांत वसतीला न्हावा !

## पाण्याच्या वाटंवर

पाण्याच्या गं वाटंवर
भेटलीस मैतरणी.
सासू-नणंदाचीं तुला
सांगितली मी गाऱ्हाणीं.

पाण्याच्या गं वाटंवर
पुसलीस माझं डोळं.
विटलेलं होतं माझं
जाचाला गं मन भोळं

पाण्याच्या गं वाटंवर
परतविलीस माघारी;
कैंगटून जातांना मी
माझ्या गं माहेरीं.

पाण्याच्या गं वाटंवर
मळयांतनं येतां त्येनी
सांगिटलास माझा छळ
डोळयांत तूं भरून पाणी.

पाण्याच्या गं वाटंवर
दिली तुझ्यापाशीं ठेव.
भागिदार होता त्यांत
माझा भाबडा गं देव.

पाण्याच्या गं वाटंवर
सांभाळलास माझा तोल
पडतांना कावून मी
आडांत त्या खोल खोल.

पाण्याच्या गं वाटंवर
सांगिटलंस शहाणपण
म्हणूनच भरल्या घरीं
आलं आज मानपण.

## वाटंवरच्या जुंधळयांत

असा वाटंवर कां रं आडवा येतोस ?
लाज वाटतीया काय तुला ?
तीन वरसाचं तुटकं
घाटलंय् मी पायाला.
भावाचं नातं लावतोस त्येंच्यासंगं
मला म्हणतोस ' वहिनी '
ह्यापायीं येत हुतास खोपीकडं ?
न्हाईत का तुला आया-बहिणी ?
— पैशांचा नगं दावूं देबाजा.
जाळ तुझ्या त्या नोटंला.
देकीं न्हाईतर भणीला तुझ्या;
आलीया बघ धुणं बडवायला.

हात सोड माझ्या दंडाचा;
न्हाईतर बोंबलून करीन सरकदान !
हितल्या हितं जुंधळ्यांत
टाकीन डोक्यावरचं जेवाण.
हातांतलीं फोडून कांकणं;
जाईन आरडत त्येंच्याकडं.
घारी-गिधाडांस्नी देतील मग
करून तुझं तुकडं तुकडं !

मस्तीच्या बोकडा,
कशाला पडतोस पायां ?—
— नका नका दाजीबा रडूं असं;
दुसऱ्याच्या धरूं नयेत बाया.

११२५५

# या थंडीच्या दिसांत

या थंडीच्या दिसांत
काय टिप्पूर चांदणं पडलंय् !
झाड–झुडूप, समदं रान
त्येच्या कांबरुणांत दडलंय्

ह्यो खुळा वडा मातूर
झाडाच्या सावलींतनं
एकटाच चाललाय् बोलत;
भ्या वाटूं नये म्हणून.

त्येच्या किचकाटांतल्या पाण्यांत
बेडक्या आरडायला लागल्यात.
कांठावर आलेलं बेडूक
पाऊल वाजतांनं आंत उडया मारत्यात.

बसल्यात झाडाचीं पानं गप
आपल्याच सावल्यांस्नी भिऊन.
वाघळा-घुबडं घुमत्यात
कवाकवातर फडफडून.

ढामणीगत वाट पडलीया सरळ
हिरव्या उंच गवतांतनं.
काजूकिडं लिकलिकत्यात
चकमकीच्या ठिणग्यागत वरनं.

आतांसं पडूं लागलंय् गवतावर दंव
गारगार लागतंय् पायाला.
सुंद हुत्यात बोटं-तळवं;
जाऊन पायजेत तासभर शेकायला.

असल्याच उंच गवतांतनं
कवातर पडतंय् लांबडं !
म्हणून देवानं सांगिटलंय् चांदाला
वसतीला जायाला आमच्यासंगं

# बाळ आतां

नेसत जा बाळ आतां
जरा पटका-धोतार.
पिंड केळीचा कोंब हाय;
दिसशील तूं भरदार !

कुळवाडी आम्ही लोक;
कशाला रं तें इजार ?
बोडक्याच डोसक्यानं
रूप दिसतंय् मुंडरं.

पैलवानी पंजी-तिडा;
पटक्याची चांद-कोर;
आणि पायांत पायताण
भुईंचालीचं पायभर.

दार भरून दिसशील
राज-बिंडा येतांना तूं,
" शिकलेला ह्यो माझा ल्योक
तोंडभरून जगा सांगूं ! "

# गोंदणं

हिरवं लुगडं
खुललंय् छान !

( तांबूळ रान- )
अंग पालवीचं पान !

लांब आऱ्याचा
भरदार दंड.

गोंदण्याच्या ठिपशा-
( भुईमुगाचं कोंब. )

असंल नवऱ्याचं नांव;
नणंदंचं तें काम !

न्हाईतर असंल
' सीता-राम ! '

## हिरवं जग

कसं हाय हें हिरवं जग !
किती दिसतंय् गुलजार !
लांबनंच बघतांना डोळं भरून
जीव हुतोय् सुखानं बेजार !

' पावसानं दिलीया हिरवी साडी
धरणीला; डोहाळ-जेवण करतांना.
न्हाईतर नेसलं असंल ठेवणीचं लुगडं;
आला असंल कुणीतरी पावणा ! '

लांबनंच बघतांना येत्यात
असं मनांत लई इचार;
पर खरं रूप न्हाई कळायचं
आऽमंदीं गेल्याबिगार.

– मऊ गवात दिसतंय् बांधावर
पर त्येच्या तळाला हाईत बाभळ-बोरीचं काटं.
ही हिरवी मखमाल कांपतांना
चाळणीगत हुत्यात हाता-पायांचीं बोटं.

ह्यो डौलारू डंगरी जुंधळा
दिसतांनं दिसतोय् लई गॉड;
पर ढेकळं फोडतांनं इथलीं
आवळ्यागत आलं हुतं फॉड !

भुईमुगाच्या गार गार जाळ्या,
हीं रसरसलेलीं गाजरं,–
हीं पिकीवतांनं जात्यात
तोंडांत मातीचं तोबरं.

असलं हाय हें
हिरवं जग !
मैतरा, तुझ्या समाधानापायीं
हें लांबनंच बघ !

# डोंगराच्या कनवटीला

डोंगराच्या कऩवटीला
न्हाई आतां पाणी-धन.

थवा ढगांचा वाटंत
म्हणून अडीवला त्येनं !

कांहीं नागीवलं पार.
थोडं सुटलं पळत;

निळ्या, पांढऱ्या गठळ्यांतनं
मोतीं-संपदा गाळत.

हुती काल जायाची ती
नदी-लेक सासराला.

न्हवता एकबी पैसा पई
पाठवणीच्या अहेराला.

बटी भरून तिची आज
नव्या हिरव्या लुगड्यांत;

धाडी डोंगर-रामोशी
तिला सागर-वाड्यांत

## गर्भ धरणीचा

झुरूं लागली पालवी !
मरूं लागलं अंकुर.
गर्भ धरणीचा देवा,
आंत तसाच राहील !

नगं पाप गा करूंस
बाळ मारून पोटांत !
चार मास तरी दूध
त्येच्या पडूं दे ओंठांत !

जीव गुदमरतो ह्या
शेतकऱ्याचा त्येच्यापायीं !
सुखा-समाधानानं गा,
कर मोकळी काळी आई !

मिळंल आम्हांलाबी अन्न
तिचा बाळ भरवतां !
ढाळ टिपं दोन तरी
समद्यापायीं भगवंता !

# केलंस मातरं जल्माचं

दादा, जर असतास
कामं कराया मळ्यांत;
केला असतास माझ्यागत
पटका-धोतराचा थाट.

झाला असतास मग
भरदार 'बाबूगत'
पन-पापुद्रा अंग तुझं
न्हाई उंचीला सोभत.

चिखलाच्या लाटचावाणी
दंड-मांड्यांतलं गोळं
उचलतां कायतरी
गटक्यानं असतं हललं.

वारं कोंडल्या भात्यागत
भरली असती तुझी छाती !
जाऊन चुटूक चालणं
आली असती धिम्मी गति.

– वहिनीबी आली असती
तुझं लगीन होऊन !
केलंस मातरं जल्माचं
दादा, शाळंला जाऊन !

# उसटं पाणी

" उनांत तंगलोंय्,
घामांत भिजलोंय्,
लागलीया ताऽन;
दे जरा पाणी.
काढ कीं तांब्या
त्यो चुंबळीच्या खालचा,
पेंडीच्या आडचा,
गारव्यांत ठेवल्याला. "

" उसटं हाय रं;
नगं पिऊं हें पाणी. "

" मग देच तर
तेंच लागंल सोजळवाणी ! "

## मी वडतों चिलीम

जरा घेऊं या इसावा
आलंय् भरामंदी ऊन.
टेकडाच्या पल्याड गांव;
इतक्यांत गाठूंया जाऊन.

भरतों जरा मी चिलीम;
मारतों योक झुरका.
वारं हाय; आडीव पदरानं
तोंडावर घेऊन बुरखा.

— न्हाईतर ये फुडंच
न्हाई आसपास घोडं-गाडी.
मी वडतों चिलीम;
तूंच लाव बेतानं काडी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ...............



न्यहार न्यहार खळणं आभाळ !
बिन अठ्यांचं हें कपाळ !

त्येच्यावरचा चांद-टिळा
भक्ति सांडतोय् रानो-माळ !

दहिंवरलं चांदणं
धुंद बांधाच्या गवतांत.

जरतारी वेण्या जशा
पैलवानाच्या जोडचांत.

पदर रुपेरी पाण्याचा
दगडावर त्या सळाळतो.

कुणी म्हणे झिपरा ओढा
बारमाही ह्यो खळाळतो !

पोट भरल्या पाण्याची
पिकलेली गवती मिशी !

चूळ चांदण्याची भरतां
निघे धुऊन चांदी जशी !

दूध प्यालेल्या बाळावाणी
फड-तंबाखू निजला !

पितो पानाच्या ओंजळीनं
अजून चांदणं जुंधळा !

विहिरीकडंच्या झाडांसनी
न्हाई घरदार म्हणं.

म्हणूनशान पेंगत्यात
खालीं घालून हीं मान !

वेताळाच्या तळ्यावर
चांदण्याचा दाट पारा.

बिनसायासें मिळाला.
आरसा ह्यो नवा कोरा !

असं भोमंच्या पुनवंला
रूप लाभतं गांवास;

चटक चांदण्यांची रात
तवा पावणी येती खास !

" ह्यो घे पानाचा इडा.
कर जरा तोंड लाल.
उनातानांत फिरून
तांबडं भडक झाल्यात गाल.
ओलावा राहील तोंडांत,
सुकणार न्हाईत ओंठ,
लागणार न्हाई ताऽन;
पडणार न्हाई सोक.
असूं दे; घे एवढा.
घाटलाय् आंत
अर्धाच्या अर्धा येलदुडा."

" आणि तूं रं ?"

" मी खाईन मागनं."

" हिकडं आण बघूं चंची."

" संपल्यात गं पानं !"

## गेलं असतील भुकेयावुनी

झळाळतां कुठं लुगडं
दुपारच्या त्या उनाला;
डोळं लागत असतील
त्येंचं घराच्या वाटंला.

हात घळलं असतील
बैलं सारून सारून.
नसंल नेटत धराया
सोंदूर शिणल्या पायानं.

कसा दाबतील नाडा
मोट भराया तळाची ?
पोळी झालेली असंल
निसाकसानं पोटाची.

मंदावलेली असंल
राजा-सरजाची धाव.
असंल गेलेला इस्त्याचा
बाई थंडयावून ताव !

नसंल भिंगरी चाकाची
घुमत चाकपटीवर !
किरकिऱ्या पोरावाणी
असंल करत कुरकूर !

मुकी झालेली असंल
तशी पहाडी लावणी.
चल बाई, बिगी बिगी
गेलं असतील भुक्यावुनी !

## व्रत

मातींतल्या घागरींत
जसं गार गार पाणी;
थंडी भरलीया आज
तशी शिवारामधूनी.
ही पांढरी पहाट
उभी नदीच्या कांठाला.
धोतर नेसून न्हालेली
जशी गरत उपासाला;

" रोज घडूं दे दर्शन
देवा, देवाचं माझ्या गा
मला टाकली त्येनं नि
धरेसंगं घाली पिंगा.
खाया मजूरी करून
देवा, मला दे बरखत.
त्येच्या पायींच करतें मी
सीता-सायित्रीचं व्रत. "

# उठा आतां

मोटा वडल्या डोणग्यांत
सुटलीं बैलं शिवळसनं.
कडबा तोडाय् लागलं
पाणकेबी भरून शेणं.

गाडग्या-भांड्यांच्या बुट्ट्यांवर
ठेवून तुरकाट्या-शिरीं;
पाय देऊन आवळल्यात
मळंकऱ्यांच्या तरण्या पोरी.

शेवरीचं शेंडं सारं
माना टाकून पडलं
दोडक्याचं हिरवं कूप
पिवळ्या फुलांनीं फुलारलं

रात व्हायची म्हणतांनं
दीस दमून गेला घरीं !
नवरा आंत येतां; हळू
दारं सांजंनं लावलीं.

फुरं भांगलण आतां
चला कराया जेवणं.
उठा; करा गं मुठी गोळा
झाडा कासूटं; काढा वसणं.

# पातळ

बाई, वाटतं कसंसंच
पाताळ नेसल्याव मला.

अंगावरच नसल्यागत
भास हुतोय् पावलाला.

सारं कोळ्याच्या जाळ्यावाणी
मऊ लूस झिरझिरीत !

घरीं येतांनं मळ्यासनं
सारखं उडतं झुळूकींत.

जरी खोचाण खोवलं
तरी हालकं फूल बरं !

डोईवर असूनबी
वाटतं पडला पदर.

सभागती वडलं मी
अडकतां घाणेरींत.

केळपानावाणी गेलं
कितीबाला टरकत !

माझ्या ढाबळी लुगडचाची
न्हाई जराबी ह्येला सर.

त्येचं जुण्यार नेसलं तरी
बरं वाटतं अंगभर !

–पैसा घाटला पाण्यांत
नको म्हणतां तेनासनी.

आणि आणलं पात्ताळ हें
मला हौसंनं वारंवाणी

# भाकरी

देव जगाचा शेतकरी.
त्येचं आभाळ काळं रान.
हुतं ढगाचं त्यांत वेल.
काढलं खुरपून वाऱ्यानं.

तीन चांदण्या-फणांचं
त्यांत घाटलं बांडगं.
आणि बांडीगलं सारं.
आली चोथ्यानं वर शेंग.

शेंगा येचायाला दिशा
आल्या भोंवतीं बांधानं.
आतां आऱ्यांत बसतील
जरा न्यहाऱ्या करून

हळू म्हणाली ' मावळती '
' माझा भाकरी-धडपा
घरांत गं इसरला. "

तवा उगवतीनं तिला
( चांद ) भाकरी एक दिली.
वर घालून भाजी-( डाग )
वरच्या वरच फेंकली.

# नाद मोटंचा ऐकून

पाऊस पडलाय् काल जरा
आणि भिजलाय् चाक-दांडा.
वाजंना झालंय् जराबी चाक;
फुटला मारून बैलांस्नी कोयंडा.

आण जरा बघून खोबरं;
हुडकून कुठलं तरी.
जरा घालतों बाहुल्यांत
बोलूं दे चाकाची भिंगरी.

– दीस उगवायला
नाद मोटंचा ऐकून;
येणार हाय दोस्तीण
पाटावर धुणं घेऊन.

# काळ्या पदराच्या आड

गेलीं परतून पांखरं
पोटं भरून घराला.

आभाळाच्या माळावरनं
दीस खालीं उतरला.

हात लावून कपाळास
सांज कुणाची वाट पाही.

आणि किनीट पडतां
लगबग घरीं जाई.

रात गेलेली कामाला
आली दमून परत.

दार उघडलं तिनं
हुता अंधार घरांत.

शेजारीं उगवतीच्या
हळू घरास तवा गेली.

काळ्या पदरा आडनं
चांद-चिमणी आणली.

– ठेंचाळशील गं राती.
सावकाश चाल बाई,

ठावक्यांतलंच तेल;
दुसराबी दिवा न्हाई !

# हुलगला बाजार

झाली सांज;
हुलगला बाजार
तालुक्या गांवचा.

माळव्या मिरचीच्या,
भाजी-भोपळ्याच्या
झाल्या मोकळ्या डाली.
भरल्या हळू हळू अन् जुंधळ्यानं, तांदळानं
केल्या उभ्या त्यांत
येशेल-खोबरेलच्या लांबट बाटल्या.
मंद जळणाऱ्या
तांबड्या रॉकेलचं हिरवं शिसं;
घालून नारळीच्या
शेंड्यांचीं बुचं.

अन् ठेवून डोईवर
चुंबळीसंगं त्या
परतल्या बायका
खेड्याच्या-पाड्याच्या
ओटचा-खोप्यांत
घेऊन चिरमुरं,
पेरू, रताळं;
भरत बकाणं
करत घास

चालल्या घाईनं
कुरकुरणाऱ्या चेपल्यांच्या नादांत;
वरचेवर चापचत
पोरांच्या खाऊचा
तेलकट भज्यांचा वर्तमानपत्री पुडका.
तेल-मिठाचा,
चहा-चटणीचा
सांगत हिशोब बोटाबोटावर.
घोळवत पुनः फिरून ओंठांवर.
काढून दंडांतलं पावल्या पैसं
घालत मेळ विक्र्याचा खर्चाशीं,
धान्याचा दिसांशीं.

रेंगाळत हुतं मन
गप्पांत, हिशोबांत;
रमलं हुतं हात
ओटचांतनं, घासांतनं.
पळवत हुता पण
पायांच्या खुंटचांना
उरांत सांठलेला
बाळाचा पान्हा.

बायका कंदी
बोलून दावत्यात
असल्या गोष्टी ?
बापयांचीच असली पाहिजे
जाणून घ्यायची खुबीची द्रिष्टी
तुम्हींबी जळलासा
मीबी जळलें
आंतल्या आंत मुक्या मनानं.
फुका फुका गेलं
बाटकावाणी
बिन फळाचं दोन चार महिनं !

पाचूच्या ह्या माळावर
गुराख्याचीं पळतीं मुलं.

त्यांच्यापायीं आंथरलीं.
रान-कोरट्याचीं फुलं.

सोन्यावाणी रंग त्येंचा.
चंद्रागत गोडं रूप

खुळचा-भोळचा फूलवेडचा
वेंचतात सूप सूप.

घडतात कंठ-हार;
आंबाड्यांतलं गजरं.

करत्यात कांकणं हीं
भरगच्च त्येंचा कर.

गळा, केसं शोभत्यात.
अप्सराहि फिकी पडे.

असा स्वर्गीय दागिना
ह्या हो फुलांतनं घडे.

चौदा चौकड्याचं राज्य.
सोनं पिके फुलांतनं.

कुणीबी घ्या हवं तसं
खंडीखंडीच्या राशीनं.

# केवड्याच्या पोटरीला

चवळीच्या शेंगा तोडत
अशी आधनं मधनं,

नगं कवा जाईत जाऊं
भुईमुगाच्या आऱ्यांतनं.

रुंद पसरलेलं वेल
गारवा धरत्यात उनाचं

हिरव्या थंडाव्यांत त्येंच्या
'कायतरी' पडतंय् ध्याचं.

– नगं हासूंस कारभारणी,
दुर्मिळ हाय तुझा रंग.

केवडयाच्या पोटरीला
खरंच डसंल भुजंग.

रेशमाचीं कणसं
डोकावलीं बाहेर
पोपटी पोटरीच्या
उबार कोटरांतनं
बघाया जगाची
कोवळी नवाळी;
हिरव्यांतली,
गारव्यांतली,
मैदान मुलुखांतली.

टोचं तुरीचं
उघडून पिवळं डोळं
कौतुकलं न्यहाळून
रेशमी बाळांना !
मिठ्या मारत
थाटांच्या पायांशीं
घेर धरला त्यांनीं,
" बाळ झाला ! बाळ झाला ! "

सरल्या भांगलणी !
थांबली आऱ्याआऱ्यांतली
उनाच्या तिरपींत घामेजणारीं गाणीं
डोलूं लागला अन्
शेवरीच्या शेंड्यावर
मडक्या-फडक्याचा

फाटका कन कावळा !
डवंग्याच्या जवळ
उंच किडमिला
राहिला डोळं वटारून
बाभळ-मेढींचा माळा !
हाऽ हाऽ ! हूऽ हूऽ !
आली बघ ! हूऽ हूऽ !
झालं शिवारांतनं
गोफण-धोंडं सुरूं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

११२४४

११२५५

पोपटाच्या रानांत
काढाय् पेरू
दुपारचं गेली मैना.
जोडव्याच्या नादांत तुरुतुरू.

उनाच्या रखांत पान नि पान
लुगड्यानं प्यालं पोटभर.
आणि पेरवाचा गुलाबी गाभा
गरवून मुरला गाला ओठावर !

तशीच आली मैना
उनातानांत घरला.
आणि पैलवानी हात
लागलं कुरवाळाय् तिला.
तवा मैना बारीक कण्हून
लसली जराशी.

हळूच सारत बाजूला हात
म्हणाली कशी,
" नका कुरवाळू मला.
खोंबारं लागल्यागत अंगांगाला.
जखमांत त्येंच्या
पडलंय् घामाचं मीठ.
फिरीवतांनं हात
लागल्यात साऱ्या चरचरायला. "

REFBK-0011255

REFBK-0011255

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम........................ विः .......५२.......
क्रमांक ........................ नों: दि: ...............